Literacy for a Billion

Movie: Vaat Chukalele Naware
Year: 1964

Song: Daan Devuni Sarvswache
Lyricist: Ramchandra Hingane

दान देऊनी सर्वस्वाचे
दान देऊनी सर्वस्वाचे
कुबेर मी अंतरी
प्रितीची रीतच ही न्यारी
प्रितीची रीतच ही न्यारी

मन हाताचा करील कणा मी
जशी कैकयी रणसंग्रामी रणसंग्रामी
दो हातांनी कष्ट उपसता
गोडी संसारी
प्रितीची रीतच ही न्यारी
प्रितीची रीतच ही न्यारी

वनात जैसे सीता माई
राम रुप ती होऊन राही
वनात जैसे सीता माई
राम रुप ती होऊन राही
पती संगती पुष्प ताटवे
कुंपण काटेरी
प्रितीची रीतच ही न्यारी
प्रितीची रीतच ही न्यारी

मनी जागवीन सावित्रीला
मनी जागवीन सावित्रीला
परतून लावील यमदूताला
पती प्रेमाहून दूजे न मोठे
भरल्या संसारी
प्रितीची रीतच ही न्यारी
प्रितीची रीतच ही न्यारी
दान देऊनी सर्वस्वाचे
दान देऊनी सर्वस्वाचे
कुबेर मी अंतरी
प्रितीची रीतच ही न्यारी
प्रितीची रीतच ही न्यारी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*